ePaper
# फडणवीसांची उद्धव ठाकरेंना थेट ऑफर, सत्तेत सहभागी होण्याचं निमंत्रण

वर्ष - 8 । अंक - 338 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

www.mahaenews.com | ।गुरुवार, दि. 17 जुलै 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



## आतील पानांत

- वेस्ट इंडिज संघाला मोठा धक्का!
- मोहम्मद सिराजची भावनिक पोस्ट
- सीरियाच्या मुख्यालयावर हवाई हल्ला!
- चित्रपटाचे प्रदर्शन थांबवने चुकीचे आहे

Pune District Education Association's
Seth Govind Raghunath Sable
College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

PDEA

Pharmacy Council of India | SPPU Affiliation | NAAC Accreditation | Maharashtra State Board of Technical Education

Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025-26

Admission Schedule for
F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |



Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your Application Now!



Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad
Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)
Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549

ePaper
फडणवीसांची उद्धव ठाकरेंना थेट ऑफर, सत्तेत सहभागी होण्याचं निमंत्रण
| वर्ष - 8 | अंक - 338 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत

- वेस्ट इंडिज संघाला मोठा धक्का!
- मोहम्मद सिराजची भावनिक पोस्ट
- सीरियाच्या मुख्यालयावर हवाई हल्ला!
- चित्रपटाचे प्रदर्शन थांबवने चुकीचे आहे

www.mahaenews.com | गुरुवार, दि. 17 जुलै 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## ‘उद्धवजी 2029 पर्यंत काहीही स्कोप नाही : फडणवीस

# सत्तेत या...!

## देवेंद्र फडणवीसांनी दिलेली खुली ऑफर, उद्धव ठाकरेंनी धुडकावली

| मुंबई | प्रतिनिधी | महाईन्यूज

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना सत्तेत सहभागी होण्याची खुली ऑफर दिली आहे. अंबादास दानवे यांचा विधान परिषदेचा कार्यकाळ संपला, त्यानिमित्तानं निरोप समारंभाचं आयोजन करण्यात आलं होतं, यावेळी बोलताना फडणवीसांनी ही ऑफर दिली आहे. आता उद्धव ठाकरे यांनी याला उत्तर दिले आहे. अंबादास दानवे यांच्या निरोप समारंभानंतर उद्धव ठाकरेंनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री फडणवीसांनी दिलेल्या ऑफरबाबत प्रश्न विचारण्यात आला होता. याला उत्तर देताना उद्धव ठाकरे म्हणाले की, ‘सभागृहात या गोष्टी खेळीमेळीने झाल्यात आणि त्या गोष्टी खेळीमेळीनेच घ्यायला हव्यात.’ याचाच अर्थ देवेंद्र फडणवीसांनी सत्तेत सहभागी होण्याची ऑफर उद्धव ठाकरेंनी धुडकावून लावली आहे.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी उद्धव ठाकरेंना ऑफरे देताना म्हटले की, ‘उद्धवजी 2029 पर्यत काहीही स्कोप नाही, आम्हाला त्या बाकावर यायचा स्कोप नाही, तुम्हाला इथं यायचं असेल तर बघा, स्कोप आहे. ते आपण वेगळ्या पद्धतीने बोलू, ठाकरेंचा शिवसेना पक्ष आजही आमचा मित्रपक्ष आहे असं म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी थेट उद्धव ठाकरे यांना सत्तेत येण्याची ऑफर दिली आहे. त्यामुळे फडणवीस यांच्या या ऑफरला उद्धव ठाकरे काय उत्तर देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते.

### देवेंद्र फडणवीसांकडून दानवेंचं कौतुक

अंबादास दानवेंना निरोप देताना देवेंद्र फडणवीसांनी म्हटले की, ‘अंबादास दानवे हे मूळचे भाजपच्या मुशीत घडलेले कार्यकर्ते. हिंदुत्ववाची कडवट भूमिका घेणारे आणि कट्टर सावरकरवादी कार्यकर्ते म्हणजे दानवे. पण जागावाटपात विधानपरिषदेची जागा शिवसेनेला गेली. मग दानवेंना शिवसेनेत जावं लागलं.’

### उद्धव ठाकरेंनी एकनाथ शिंदेंजवळ बसणं टाळलं

उद्धव ठाकरे आल्यानंतर त्यांना सर्वच नेते समोरच्या रांगेत बसण्याची विनंती करू लागले. यावेळी फोटोसेशनसाठी विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शेजारी बसल्या होत्या. मात्र उद्धव ठाकरे यांना पाहताच त्या आपल्या आसनावरून उठल्या आणि त्यांना एकनाथ शिंदे यांच्या शेजारी बसण्याची विनंती केली. मात्र उद्धव ठाकरे यांनी शिंदे यांच्या शेजारी बसण्यास नकार दिला. विशेष म्हणजे उद्धव ठाकरे दुसऱ्या खुर्चीवर बसायला गेल्यानंतर एकनाथ शिंदे यांनीदेखील नीलम गोऱ्हे यांच्याकडे पाहात त्यांना नेमून दिलेल्या आसनावर बसण्याची विनंती केली. त्यानंतर नीलम गोऱ्हे एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरे यांच्यादरम्यान असलेल्या रिकाम्या खुर्चीवर बसल्या.

### फडणवीसांशी संवाद, पण

दरम्यान, फोटोसेशनवेळी घडलेल्या याच प्रकाराची सध्या सगळीकडे चर्चा चालू आहे. यावेळी उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संवाद साधला. पण एकनाथ शिंदे यांच्याशी बोलणं तसेच त्यांच्या शेजारीही बसणं टाळलं. त्यामुळे फोटोसेशनदरम्यान घडलेल्या याच प्रकाराची सगळीकडे चर्चा होत आहे.

### नेमकं काय म्हणाले फडणवीस?

अंबादास दानवे यांचा विधान परिषदेच्या विरोधी पक्षनेतेपदाचा कार्यकाळ संपला आहे, त्यांच्या निरोप समारंभाच्या भाषणावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार टोलेबाजी केल्याचं पाहायला मिळालं. उद्धवजी 2029 पर्यत काहीही स्कोप नाही, आम्हाला त्या बाकावर यायचा स्कोप नाही, तुम्हाला इथं यायचं असेल तर बघा, स्कोप आहे. ते आपण वेगळ्या पद्धतीने बोलू, असं म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी थेट उद्धव ठाकरे यांना सत्तेत येण्याची ऑफर दिली आहे, फडणवीस यांच्या या वक्तव्याची आता जोरदार चर्चा सुरू झाली आहे. ठाकरेंचा शिवसेना पक्ष आजही आमचा मित्रपक्ष असल्याचंही यावेळी फडणवीस यांनी म्हटलं आहे.

मुंबईमध्ये पाच जुलै रोजी विजयी मेळावा पार पडला, या मेळाव्याला दोन्ही ठाकरे बंधुंची उपस्थिती होती, मनसे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची उपस्थिती होती, या मेळाव्यानंतर पुन्हा एकदा मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाच्या युतीची चर्चा रंगली आहे, याच दरम्यान आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंना सत्तेत सहभागी होण्याची ऑफर दिल्यानं फडणवीसांच्या या वक्तव्याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. ठाकरेंचा शिवसेना पक्ष आजही आमचा मित्रपक्ष असल्याचंही ते यावेळी म्हणाले आहेत.

# ‘जलशुद्धीकरण केंद्र उभारण्यास प्राधान्य’!

## समाविष्ट झालेल्या प्रत्येक गावासाठी प्राथमिक नियोजन आराखडा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या ३२ गावांपैकी प्रत्येक गावाचा प्राथमिक नियोजन आराखडा करण्यात येणार आहे. या गावात विकासकामे करण्यासाठी येथील ग्रामस्थांकडून केली जाणारी मागणी आणि महापालिकेचे नियोजन यामध्ये संभ्रम असल्याने हा निर्णय घेण्यात आल्याचे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितले.**




महापालिकेत समाविष्ट झालेल्या ३२ गावांतील विकास कामांसंदर्भात राज्य सरकारने नियुक्त केलेल्या प्रतिनिधींची बैठक मंगळवारी महापालिकेत झाली. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीला समितीचे सदस्य, अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी, ओमप्रकाश दिवटे तसेच विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना आयुक्त राम यांनी प्रत्येक गावाचा प्राथमिक नियोजन आराखडा तयार करण्यात येणार असल्याची माहिती दिली. समाविष्ट गावांच्या विकासासाठी महापालिकेच्या अंदाजपत्रकात करण्यात आलेल्या तरतुदीतून कोणत्याही प्रकारचे वर्गीकरण केले जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.‘आठ वर्षांपूर्वी २०१७ पासून ही गावे टप्प्याटप्प्याने महापालिकेत समाविष्ट झाली आहेत. तेव्हापासून महापालिका तेथे विकासाची कामे करत आहे. विकासकामांबाबत ग्रामस्थांच्या वेगवेगळ्या मागण्या आहेत. मात्र, प्रशासनाचे नियोजन वेगळ्या पद्धतीने झाले आहे. त्यामुळे नेमकी समस्या काय आहे आणि महापालिका काय करीत आहे, यामध्येच गोंधळ आहे, असे आयुक्तांनी सांगितले. महापालिकेने आतापर्यंत प्रत्येक गावात कोणती कामे केली, किती निधी दिला, या वर्षी नेमकी काय कामे करण्यात येणार आहेत, त्यासाठी तरतूद किती, नागरिकांची मागणी नेमकी काय, याची संपूर्ण माहिती स्वतंत्र आराखड्यात राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.‘समाविष्ट गावांमध्ये पिण्याचे पाणी ही सर्वांत मोठी समस्या आहे. येथील नागरिकांना पिण्याचे स्वच्छ आणि पुरेसे पाणी मिळावे, यासाठी नवीन जलशुद्धीकरण उभारण्याबाबत आराखडा तयार केला जाणार आहे. याबाबत प्रशासनाला सूचना देण्यात आल्या आहेत. या प्रकल्पासाठी राज्य सरकार निधी देणार असले, तरी राज्य सरकारच्या निधीची वाट न पाहता तातडीने महापालिकेच्या निधीतून प्रकल्प मार्गी लावता येईल का, याचा विचार सुरू असल्याचे महापालिका आयुक्तांनी सांगितले.‘समाविष्ट गावांमध्ये पिण्याचे पाणी ही सर्वांत मोठी समस्या आहे. येथील नागरिकांना पिण्याचे स्वच्छ आणि पुरेसे पाणी मिळावे, यासाठी नवीन जलशुद्धीकरण उभारण्याबाबत आराखडा तयार केला जाणार आहे. याबाबत प्रशासनाला सूचना देण्यात आल्या आहेत. या प्रकल्पासाठी राज्य सरकार निधी देणार असले, तरी राज्य सरकारच्या निधीची वाट न पाहता तातडीने महापालिकेच्या निधीतून प्रकल्प मार्गी लावता येईल.

### विविध विभागांचे प्रमुख उपस्थितत

महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या ३२ गावांपैकी प्रत्येक गावाचा प्राथमिक नियोजन आराखडा करण्यात येणार आहे. या गावात विकासकामे करण्यासाठी येथील ग्रामस्थांकडून केली जाणारी मागणी आणि महापालिकेचे नियोजन यामध्ये संभ्रम असल्याने हा निर्णय घेण्यात आल्याचे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितले.ल्या ३२ गावांतील विकास कामांसंदर्भात राज्य सरकारने नियुक्त केलेल्या प्रतिनिधींची बैठक मंगळवारी महापालिकेत झाली. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीला समितीचे सदस्य, अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी, ओमप्रकाश दिवटे तसेच विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

# शैक्षणिक दाखल्यांसाठी विद्यार्थ्यांची धावाधाव

## सेतू, महा ई-सेवा केंद्रातील तांत्रिक बिघाडाचा फटका

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील नागरी सुविधा केंद्र (सेतू) आणि महा ई-सेवा केंद्रात सातत्याने होणाऱ्या तांत्रिक बिघाडाचा फटका विद्यार्थी आणि पालकांना बसत आहे. इयत्ता दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना पुढील प्रवेशासाठी विविध दाखल्यांची आवश्यकता असल्याने ते वेळेत मिळत नसल्याने प्रलंबित प्रकरणांची संख्याही वाढत आहे.**



दरम्यान, महा ई-सेवा केंद्राचा सर्व्हर डाऊन होत असल्याने कामकाज करण्यावरही मर्यादा येत असल्याने विविध प्रकारचे दाखले देण्यास अडचणी येत आहेत, असा दावा केंद्र चालकांकडून करण्यात आला आहे. त्यासंदर्भातील निवेदनही महा ई-सेवा केंद्र चालकांनी जिल्हाधिकारी कार्यालयाला दिले आहे. सेतू कार्यालय आणि महा ई-सेवा केंद्राचे सर्व्हर सतत डाऊन होत असल्याने कामकाज पूर्ण बंद होत आहे. ऑनलाइन प्रक्रियेमध्ये वारंवार अडचणी येत आहेत, असे या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.यापूर्वी महा ई-सेवा केंद्र चालकांचे लॉगिन हे एकापेक्षा जास्त प्रणालीवर करता येणे शक्य होते. मात्र अलीकडे एक लॉगिन प्रणालीची अंमलबजावणी सुरू आहे. त्यामुळे महा ई-सेवा किंवा सेतू केंद्र चालकांना कामकाज करण्यास मर्यादा येत आहेत. त्याचा फटका नागरिकांना बसत आहे.

एका लॉगिनवर सर्व प्रकारचे कामकाज करणे केंद्र चालकांसाठी अडचणीचे ठरत आहे.सध्या शैक्षणिक प्रवेश प्रक्रिया सुरू असल्याने अनेक प्रकारच्या दाखल्यांसाठी सेतू कार्यालय आणि महा ई-सेवा केंद्रांकडे मोठ्या प्रमाणावर अर्ज येत आहेत. त्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे दिल्यानंतरही दाखले वेळेत उपलब्ध होत नसल्याची विद्यार्थ्यांची तक्रार आहे. दरम्यान, एकाच लॉगिन प्रणालीमुळे एकाच संगणकावर काम करावे लागत आहे. त्यामुळे कामे प्रलंबित राहत आहेत. प्रणालीतील त्रुटींमुळे कार्यालयीन वेळेत दिवसभर केवळ अर्ज स्वीकारले जात आहेत. अर्जांची ऑनलाइन प्रक्रिया होत नसल्यामुळे दाखले तयार करण्यासाठी सुटीच्या दिवशी किंवा रात्री उशिरा काम करावे लागत आहे. दरम्यान, सुटीच्या दिवशी महा ई-सेवा केंद्र किंवा सेतू कार्यालयांना दाखले देण्यासाठीच्या शिबिरांचे आयोजन करावे लागत आहे. त्यामुळेही कामाचा ताण वाढत असल्याचा दावा केंद्र चालकांकडून करण्यात आला आहे.महा ई-सेवा केंद्रांचा सर्व्हर सातत्याने डाऊन होत आहे. त्यामुळे दाखल्यांची प्रलंबित संख्याही वाढत आहे. ही समस्या तातडीने सोडविण्यात यावी, असे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयाला दिले आहे.

### केवळ अर्ज स्वीकारले जात आहेत

सर्व्हर डाऊन होण्याबरोरच अन्य काही तांत्रिक अडचणी येत होत्या. मात्र त्या दूर करण्यात आल्या आहेत. त्यामुळे महा ई-सेवा केंद्र आणि सेतू कार्यालयातून दाखले देण्याची प्रक्रिया सुरळीत झाली आहे. त्यातूनही काही अडचणी आल्यास जिल्हा प्रशासनाकडून त्याची तातडीने दखल घेत कार्यवाही केली जात आहे. प्रणालीतील त्रुटींमुळे कार्यालयीन वेळेत दिवसभर केवळ अर्ज स्वीकारले जात आहेत.

## सहा महिन्यांमध्ये 74 अपघातांत 22 जणांचा मृत्यू

# तळेगाव-चाकण-शिक्रापूर महामार्गावर अपघातांना निमंत्रण!

### तळेगाव चाकण चौकामध्ये बुधवारी नागरिकांचा स्वयंस्फूर्तीने रास्ता रोको

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**तळेगाव-चाकण-शिक्रापूर महामार्गावरील अपघातांचे प्रमाण प्रचंड वाढत आहे. गेल्या सहा महिन्यांत ७४ अपघात झाले असून, त्यांत २२ जणांना जीव गमवावा लागला आहे. सोमवारी (१४ रोजी) आणखी एक अपघात आणि आणखी एक बळी गेल्यानंतर तरी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींना जाग येणार का? असा संतप्त सवाल नागरिक करीत आहेत.**




या अपघातांची नेमकी जबाबदारी निश्चित करून प्रतिबंधात्मक उपाययोजनाकराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे. जवळपास रोजच प्राणघातक अपघात होत असल्यामुळे या महामार्गानेजाणाऱ्यांना जीव मुठीत धरूनच वाहन चालवावे लागते. याच पार्श्वभूमीवर बुधवारी नागरिकांनी एकत्र येत तळेगाव चौकामध्ये रास्ता रोको करत प्रशासनाचे याकडे लक्ष वेधले.

तळेगाव-चाकण-शिक्रापूर महामार्ग हा राज्यातील एक सर्वाधिक व्यस्त महामार्ग गणला जातो. महामार्गाच्या रुंदीकरणाचा प्रस्ताव गेल्या अनेक वर्षांपासून 'लाल फिती'त अडकला आहे. पावसामुळे महामार्गावर जागोजागी प्रचंड खड्डे पडले आहेत. त्यात पावसाचे पाणी साचत असल्यामुळे रस्ते निसरडे झाले आहेत. परिणामी, या महामार्गावर वाहतूककोंडीची समस्या दिवसेंदिवस तीव्र होत असून, अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. दररोज छोटे-मोठे अपघात होतच असतात. यात जीवितहानी आणि गंभीर जखमी होण्याचे प्रमाणही मोठ्या प्रमाणावर वाढत आहे.

शिक्रापूर-चाकण या मार्गावर ३३ अपघात झाले असून, १० जणांचा मृत्यू झाला. तर, चाकण-तळेगाव मार्गावर ४१ अपघात झाले असून, १२ जणांचा मृत्यू झाला आहे.

सोमवारी (१४ रोजी) सकाळी साडेसहाच्या सुमारास खालुंब्रे (ता. खेड) येथील धुंदाई चौकात झालेल्या भीषण अपघातात दुचाकीस्वार तरुणाचा अवजड ट्रेलरच्या चाकाखाली चिरडून जागीच मृत्यू झाला, तर एकजण गंभीर जखमी झाला होता. या महामार्गावर २४ तासांत तीन अपघात झाले असून, यांत दोनजणांचा बळी गेला आहे. त्यामुळे हा महामार्ग आहे की मृत्यूचा सापळा असा सवाल उपस्थित केला जात आहे.

**नागरिकांचा उत्स्फूर्त रास्ता रोको**

तळेगाव चाकण महाळुंगे शिक्रापूर या परिसरातील वाहतूक कोंडी अपघातांची मालिका रस्त्यांवर येणाऱ्या समस्या या विरोधात बुधवारी 16 जुलै नागरिकांनी उत्स्फूर्तपणे एकत्र येत रास्ता रोको केला प्रशासनाच्या अनामूल्य कारभारावर संताप व्यक्त करत या परिसरातील वाहतुकीचे प्रश्न सोडवण्याची मागणी केली.

## डीबीटी'चा ४० हजारांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना लाभ!

### 31 जुलै पर्यंत शालेय साहित्याचे किट वितरण पूर्ण करण्याचे नियोजन

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महापालिकेने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपासाठी सुधारित थेट लाभ हस्तांतरण म्हणजेच डीबीटी उपक्रम सुरू केला आहे. महापालिकेच्या १४६ शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचा थेट लाभ मिळावा, या उद्देशातून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमातून आतापर्यंत तब्बल ४० हजार ८६१ विद्यार्थ्यांना शालेय साहित्याच्या किटचे वितरण करण्यात आले आहे. या उपक्रमाचा महत्त्वाचा टप्पा पार झाला असून उर्वरीत विद्यार्थ्यांनाही ३१ जुलै २०२५ पर्यंत शालेय साहित्याचे किट देण्याच्या दृष्टिने नियोजन करण्यात आले आहे.**




पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सर्व शाळा १६ जून २०२५ रोजी उत्साहात सुरू झाल्या. त्यानंतर एका महिन्यातच शिक्षण विभागाने सुधारित थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) उपक्रमांतर्गत ई-रुपी डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे सुरक्षित, रोखविरहित व्यवहार करून ४० हजार पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य किट पुरविले आहे. या किटमध्ये नामांकित कंपन्यांच्या शैक्षणिक दृष्ट्या आवश्यक असणाऱ्या १२ वस्तूंचा समावेश आहे. बँक ऑफ महाराष्ट्र यांच्या सहकार्याने ही प्रक्रिया राबविल्यामुळे त्यामध्ये पारदर्शकता व गतिमानता दिसून आली आहे. पिंपरी चिंचवड मनपा शाळेत

१६ जुलै २०२५ पर्यंत डीबीटी प्रक्रियेद्वारे ४० हजार ८३१ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिळाले आहे.आतापर्यंत वाटप केलेल्या शैक्षणिक साहित्याची किंमत सुमारे १५ कोटी ५६ लाख ७० हजार रुपये आहे.

> "डिजिटल ई-रुपी पेमेंट प्रक्रियेद्वारे आम्ही एका महिन्यात ४० हजार ८६१ विद्यार्थ्यांपर्यंत शैक्षणिक साहित्य पोहचवले आहे. बँक ऑफ महाराष्ट्राच्या सहकार्याने ही प्रक्रिया अधिक सुलभ झाली आहे.
> –**संगीता बांगर,** प्रशासन अधिकारी, पिंपरी चिंचवड महापालिका

> "शैक्षणिक साहित्य वाटपात पारदर्शकता व गतिमानता राहावी, यासाठी थेट लाभ हस्तांतरण योजना राबवण्यात येत आहे. शाळांमधील प्रत्येक विद्यार्थ्याला दर्जेदार शैक्षणिक साहित्य मिळावे, यासाठी हा उपक्रम यशस्वी ठरत आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येणाऱ्या शैक्षणिक साहित्याचा दररोज आढावा घेण्यात येत आहे. उर्वरीत सर्व विद्यार्थ्यांना ३१ जुलै २०२५ पर्यंत शैक्षणिक साहित्य मिळेल, असे नियोजन आहे.
> - **शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग »



### गुरुआज्ञापालनाशिवाय दुसरे कर्तव्यच उरले नाही

परमात्म्याकडे जाण्याचे अनेक मार्ग आहेत. आपल्या गुरूंनी जो राजमार्ग दाखविला त्यानेच जावे. मध्येच दुसरा मार्ग घेतला, तर पल्ला कधीच गाठायचा नाही. एका वैद्याचे औषध सोडून दुसऱ्याचे घेतले, तर पहिल्या वैद्याची जबाबदारी संपली. तरीही मी माझ्या माणसाला सोडीत नाही ही गोष्ट निराळी. ज्या दिवशी मी तुम्हाला अनुग्रह देऊन आपला म्हटले, त्या दिवशीच सर्व प्रापंचिक आणि पारमार्थिक जबाबदारी गुरूवर सोपवून तुम्ही मोकळे झाला; गुरुआज्ञापालनाशिवाय तुम्हाला दुसरे कर्तव्यच उरले नाही. पण तुम्हाला असे वाटते कुठे ?

विष हे आमटीत घातले काय किंवा भाजीत घातले काय; दोन्ही त्याज्यच; त्याप्रमाणे अभिमान व्यवहारात असला काय किंवा पारमार्थिक साधनात असला काय, दोन्ही त्याज्यच. मी कोण हे आधी जाणले पाहिजे; परमात्मा कोण ते मग आपोआपच कळते. दोघांचेही स्वरूप एकच आहे, म्हणजे दोघेही एकच आहेत. परमात्मा निर्गुण आहे, आणि तो जाणण्यासाठी आपणही निर्गुण असायला पाहिजे. म्हणून आपण देहबुद्धी सोडली पाहिजे. कोणतीही गोष्ट आपण ' जाणतो ' म्हणजे आपल्याला त्या वस्तूशी तदाकार व्हावे लागते; त्याखेरीज जाणणेच होत नाही. म्हणून परमात्म्याला जाणण्यासाठी आपणही नको का परमात्मस्वरूप व्हायला ? यालाच ' साधू होऊन साधूस ओळखणे, ' किंवा ' शिवो भूत्वा शिवं यजेत ' असे म्हणतात. आता, कोणत्याही वस्तूचा आकार आपल्याला प्राप्त होण्यासाठी आपल्याजवळ तत्सदृश असे संस्कार पाहिजेत. ते संस्कार त्या वस्तूच्या आघाताने प्रत्याघातरूपाने उद्भूत होतात; नंतर त्या वस्तूचे ज्ञान होते. म्हणून परमात्मरूपाला विरोधी असे सर्व संस्कार घालवून, आपण आपले अंत:करण पोषक संस्कारांनी युक्त केले पाहिजे. जर आपण साधन करून निष्पाप होऊ शकलो, तर आपल्याला जगात पाप दिसणेच शक्य नाही. देवाच्या गुणाने आणि रूपाने त्याचे गुण आणि रूप मिळेल, पण त्याच्या नामाने तो जसा असेल तसा सर्वच्या सर्व मिळतो. म्हणून नाम हे साधन श्रेष्ठ आहे. आपण भगवंताच्या नामात राहिले पाहिजे; त्यातच जीवनातले सर्व सुख सामावले आहे. याहून दुसरे काय मिळवायचे ? मी सुखाचा शोध केला, आणि ते मला सापडले. म्हणून मी तुम्हाला त्याचा निश्चित मार्ग सांगेन. तो मार्ग म्हणजे, भगवंताचे अनुसंधान होय. मी अत्यंत समाधानी आहे, तसे तुम्ही समाधानी रहा. जे मी सुरुवातीला सांगितले तेच मी शेवटी सांगतो : तुम्ही कसेही असा, पण भगवंताच्या नामाला सोडू नका. अंतकाळी अगदी शेवटी सुटणारी वस्तू म्हणजे भगवंताचे नाम पाहिजे.

\नामात शेवटचा श्वास गेला पाहिजे. याहून दुसरे काय मिळवायचे ?

बोधवचन:- आपल्याकडून होईल तेवढे नाम घ्यावे. न होईल त्याचा राम कैवारी आहे.



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**राष्ट्रवादी काँग्रेसमधील शरद पवार गटाच्या प्रदेशाध्यक्षपदी विधान परिषद सदस्य शशिकांत शिंदे यांची निवड शरद पवार यांनी केली. त्यांनीच घोषणा करत जयंत पाटील यांच्या राजीनामा दिला की नाही? या कोणालाही नसलेल्या कुतूहलाला पूर्णविराम दिला. बारामतीतील वाड्यावरील पाटील की संपली आणि शिंदे शाही सुरू झाली, एवढाच त्याचा अर्थ !**

# जयंतरावांना पद नको होते, का श्रेष्ठींना ठेवायचे नव्हते?




### दिसते तसे कधीच नसते..

जयंत पाटील यांनी काही दिवसांपासून प्रदेशाध्यक्षपद सोडण्याची फारच ओढ लागली होती. कसेबसे त्यांना काही दिवस रोखून धरण्यात वरिष्ठांना यश आले. अर्थात् राजकरणात जे दिसते तसे कधीच नसते. ते तसे वाटावे, अशी रचना तरबेज राजकारणी करत असतात. सर्वसामान्य जनता त्यावर भाबडेपणाने विश्वास ठेवत असते. आता, जयंत पाटील यांना पदावर राहायचे नव्हते, की श्रेष्ठींना ठेवायचे नव्हते, याचा खरा खुलासा कधीच जाहीर होणार नाही. झालाच तर तो भूतकाळात काय झाले, याचा संदर्भ देताना होईल.

### राजकारणातले डावपेच अनाकलनीय..

असो. राजकारणातले डावपेच सर्वसामान्यांसाठी कधीच नसतात. मुद्दा आहे, तो राष्ट्रवादी मधील शरद पवार गट प्रदेशाध्यक्षपदाच्या जबाबदारीचा ! काँग्रेसने हर्षवर्धन सपकाळ यांना प्रदेशाध्यक्ष नेमले ते याच वर्षात.. काँग्रेसमध्ये विधानसभेच्या निकालानंतर पक्षात जान आणण्याची आवश्यकता होती. लोकसभेचे यश विधानसभेच्या निवडणुकीत परावर्तित करता आले नाही. त्यामुळे बदल अपरिहार्य होता . आता, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. महानगरपालिकेच्या महत्वाच्या वाटाघाटी आहेत. या सगळ्याचा विचार केला तर राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या अध्यक्षपदावरही ताज्या दमाचा खेळाडू येणार हे नक्की होते..!

### पवार यांचा विश्वास, पण अपयशाची झालर..

शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांच्याशी एकनिष्ठ असणाऱ्या शशिकांत शिंदे यांची निवड होणार हे निश्चित होते. आता, येऊ घातलेल्या निवडणुका हे शशिकांत शिंदे यांच्या समोर मोठे आव्हान असेल. शशिकांत शिंदे यांनी दोनदा विधानसभा आणि एकदा लोकसभा निवडणूक लढली. या सगळ्या निवडणुकांत त्यांना अपयश आले. नवख्या महेश शिंदे यांनी त्यांना पराभूत केले. तर लोकसभेवेळी उदयनराजे भोसले यांनी शशिकांत शिंदे यांना पराभवाची चव चाखवली, हे सर्वश्रुत आहे.

### शशिकांत शिंदे यांच्या पुढील आव्हाने..

आता हे सगळे अपयशाचे ओझे पाठीवर टाकून शशिकांत शिंदे यांना पुनःश्च हरीओम म्हणावे लागणार आहे. केवळ सातारा जिल्ह्यात नाही, तर आता जबाबदारी संपूर्ण राज्याची आहे. मुंबई हे शरद पवार यांचे कधीच लक्ष नव्हते, मात्र पश्चिम महाराष्ट्र पुन्हा एकदा ताब्यात आणण्याचे आव्हान त्यांच्या पुढे आहे. आपला मतदार संघ, जिल्हा, पश्चिम महाराष्ट्र मग उर्वरित राज्य आणि शेवटी मुंबई..असे लक्ष्य त्यांना ठेवावे लागेल. पक्षाची गळती थांबवणे, जुने कार्यकर्ते पुन्हा उभे करणे, नवीन कार्यकर्ते जमा करणे, नेत्यांची दुसरी फळी निर्माण करणे, हे महत्वाचे आहे. आणि मुख्य म्हणजे सत्ता २०२९ पर्यंत मिळणार नाही, तो पर्यंत दहा आमदार टिकवणे हे शिवधनुष्य आहे. रोहित पवार, जयंत पाटील आणि जितेंद्र आव्हाड सोडून केवळ एक आमदार वगळता बरेचसे आमदार अजित पवार यांच्या गळाला लागण्याची शक्यता दाट आहे, हेही लक्षात ठेवायला हवे!

### शिंदे घराण्याचा पराक्रमी इतिहास..

एखाद्या आमदाराच्या आडमुठ्या धोरणामुळे अजित पवार यांचा पक्ष सातजणांच्या प्रतीक्षेत आहे. हे सगळे हाताळणे आणि मार्गावर आणण्याचे प्रयत्न करावे लागणार आहेत. आव्हाने पक्ष टिकवून सक्षम करण्यापर्यंत आहेत. जयंत पाटील सौम्य प्रकृतीचे होते. भाजपच्या वाटेवर आहेत, असे गृहीतक कायम विरोधकांनी पसरवून त्यांच्या बद्दल संशयाचे धुके तयार केले होते. त्यांना पाटीलकी सांभाळताना याचा नक्कीच त्रास झाला असेल. मात्र शिंदे घराण्याचा पराक्रमी इतिहास कण्हेरखेड येथून सुरु झाला, ते कण्हेरखेड शशिकांत शिंदे यांच्या मतदार संघात येते. तेव्हा आता पक्षासाठी त्यांनी देदीप्यमान शिंदेशाही रुजवावी लागेल आणि वृद्धिंगत करावी लागेल.

### पक्षाला उभारी मिळणार ?

पाटीलकी जावो, नाहीतर शिंदे शाही येवो, ते शरद पवार यांच्या शिल्लक राष्ट्रवादीला कितपत अनुकूल ठरणार, हा खरा प्रश्न आहे. शरद पवार यांचे सर्व मनसुबे उधळून लावून अजित पवार यांनी भारतीय जनता पार्टीच्या हातात हात मिसळले आहेत. शिवाय त्यांच्याबरोबर मूळ शिवसेनेचा मोठा भाग एकनाथ शिंदे यांच्या रूपाने उभा आहे. त्यामुळे शरद पवार गटाच्या विस्तारासाठी किंवा उत्तुंग भरारी घेण्यासाठी शशिकांत शिंदे यांच्या पंखामध्ये बळ देण्याचे काम शरद पवार करू शकणार का, हा प्रश्न आहे आणि त्याचे उत्तर नक्कीच नकारात्मक मिळत आहे, हे निश्चित !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मानसशास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणार!

## राज्यात मुली, महिला बेपत्ता होण्याचे प्रमाण सतत वाढत आहे

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**राज्यात मुली, महिला बेपत्ता होण्याचे प्रमाण सतत वाढत आहे. बेपत्ता झालेल्या लहान मुलाचा शोध घेण्यासाठी सरकारने मुस्कान मोहीम राबविली होती. आता बेपत्ता महिलांचा शोध घेण्यासाठी शोध मोहीम (ऑपरेशन शोध) सुरू करण्यात येणार आहे. शिवाय बेपत्ता व्यक्तींचा शोध घेण्यासाठी केंद्र सरकारच्या बेपत्ता संकेतस्थळाचाही (मिसिंग पोर्टल) उपयोग केला जात आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली.**



बेपत्ता होणाऱ्या मुलींची आणि महिलांची संख्या दिवसोंदिवस वाढत आहे. या संदर्भात राज्य सरकार काय उपाययोजना करणार आहे, असा प्रश्न सुनिल शिंदे यांनी उपस्थित केला होता. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, प्रज्ञा सातव, चित्रा वाघ आदींनी चर्चेत सहभाग घेतला.राज्यात बेपत्ता होण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात घडतात. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर या बाबतचा गुन्हा दाखल करणे अनिवार्य झाले आहे. बेपत्ता झालेल्यांचा तीन – चार वर्ष शोध सुरू असतो, त्यानंतर शोध थांबतो. राज्य सरकारने बेपत्ता झालेल्या मुलांचा शोध घेण्यासाठी मुस्कान मोहीम (ऑपरेशन मुस्कान) सुरू केले. या अंतर्गत ४१,१९३ लहान मुलांचा यशस्वीपणे शोध घेण्यात आला. या मोहीमेची दखल केंद्र सरकारसह विविध राज्यांनी घेतली आहे. आता आपण महिलांसाठी शोध मोहीम (ऑपरेशन शोध) सुरू केली आहे.दीड – दोन वर्षांत बेपत्ता झालेल्यापैकी ९४ – ९६ टक्के महिलांचा शोध घेतला जातो. पण, तीन – चार टक्के महिला सापडत नाहीत. संबंधितांच्या घरचेही पाठपुरावा करीत नाहीत. पोलिसही नव्याने बेपत्ता झाल्याचे गुन्हे दाखल होत असल्यामुळे जुन्या गुन्ह्यांचा शोध थांबवितात. त्यामुळे आता राज्यात बेपत्ता कक्ष (मिसिंग सेल) स्थापन करण्यात आला आहे. अतिरिक्त पोलिस महानिरीक्षक दर्जाच्या महिला अधिकाऱ्यांकडे हे काम दिले आहे. या शोध मोहिमे अंतर्गत या अंतर्गत १७ एप्रिल ते १५ मे, या एका महिन्यात ४९६० महिला आणि १३६४ बालकांचा शोध लावला. त्यापैकी १०६ महिला आणि ७०३ बालके अशी सापडली की, त्यांची कुठे नोंद नव्हती, गुन्हे दाखल झालेले नव्हते.

हा उपक्रम सुरू ठेवणार आहोत. केंद्र सरकारने सुरू केलेल्या बेपत्ता संकेतस्थळावर (मिसिंग पोर्टल) सर्व राज्यांनी माहिती भरावयाची आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

### चार टक्के महिला सापडत नाहीत

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, प्रज्ञा सातव, चित्रा वाघ आदींनी चर्चेत सहभाग घेतला.राज्यात बेपत्ता होण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात घडतात. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर या बाबतचा गुन्हा दाखल करणे अनिवार्य झाले आहे. बेपत्ता झालेल्यांचा तीन – चार वर्ष शोध सुरू असतो, त्यानंतर शोध थांबतो. राज्य सरकारने बेपत्ता झालेल्या मुलांचा शोध घेण्यासाठी मुस्कान मोहीम (ऑपरेशन मुस्कान) सुरू केले. या अंतर्गत ४१,१९३ लहान मुलांचा यशस्वीपणे शोध घेण्यात आला. या मोहीमेची दखल केंद्र सरकारसह विविध राज्यांनी घेतली आहे. आता आपण महिलांसाठी शोध मोहीम (ऑपरेशन शोध) सुरू केली आहे.दीड – दोन वर्षांत बेपत्ता झालेल्यापैकी ९४ – ९६ टक्के महिलांचा शोध घेतला जातो. पण, तीन – चार टक्के महिला सापडत नाहीत. संबंधितांच्या घरचेही पाठपुरावा करीत नाहीत.

विरोधी पक्षनेते दानवे यांनी बेपत्ता होणाऱ्या महिलांचा मानसशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय अभ्यास करून या बाबत कायमस्वरुपी उपाययोजना करण्याची केलेली मागणी योग्य आहे. सरकार त्या दृष्टीने प्रयत्न करेल. दुर्दैवाने आजही जगात मानवी तस्करी हा आजही सर्वात मोठा अवैध व्यवसाय आहे. भरोसा शाखेच्या अंतर्गत हे काम काही प्रमाणात केले जाते.पण, त्यात फारसे यश आले नाही. पोलिस काका आणि पोलिस दीदी, या कार्यक्रमात आता बेपत्ता हा विषय समाविष्ट करण्यात येईल. विभक्त कुटुंब पद्धतीमुळे वृद्धांना सोडून देण्याच्या घटना वाढत आहेत. काही मानसिक आजारामुळे घर सोडून जातात. त्यांच्यासाठी काही आधार केंद्रे आहेत. पण, ती पुरेशी नाहीत, त्यात वाढ करण्यात येईल.बेपत्ता होणाऱ्या मुलींची आणि महिलांची संख्या दिवसोंदिवस वाढत आहे. या संदर्भात राज्य सरकार काय उपाययोजना करणार आहे.

# कोयना धरणाचे दरवाजे साडेतीन फुटांपर्यंत उघडले

## कोयना धरणाचा जलविसर्ग 11 हजार 400 क्युसेकपर्यंत वाढवला

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**कोयना धरणाचे सहा वक्री दरवाजे आज बुधवारी दुपारी १२ वाजता दीड फुटावरून साडेतीन फुटांपर्यंत उघडून कोयना नदीपात्रातील प्रतिसेकंद ३ हजार ४०० क्युसेकचा (घनफूट) जलविसर्ग ९ हजार ३०० क्युसेकपर्यंत वाढवण्यात आला. तर, धरणाच्या पायथा वीजगृहातून प्रतिसेकंद २ हजार १०० क्युसेक जलविसर्ग सुरूच असल्याने धरणातून एकंदर ११ हजार ४०० क्युसेकचा जलविसर्ग झाला आहे. कोयना पाणलोटात तुफान पाऊस ओसरला असलातरी दमदार पर्जन्यवृष्टी सुरू असल्याने धरणाच्या दरवाजातील विसर्ग वाढणार आहे.**



कोयनेच्या दरवाजातून काल मंगळवारी सकाळी ११ वाजल्यापासून ३ हजार ४०० क्युसेकचा जलविसर्ग सुरू करण्यात आला. जुलैच्या मध्यावर जलविसर्ग करण्याची ही पहिलीच वेळ होती. आता धरणक्षेत्रातील जोरदार पावसाने या जलविसर्गात आणि कृष्णा- कोयना नद्यांच्या पाणीपातळीतही वाढणार असल्याने या दोन्ही नद्यांकाठच्या लोकांना खबरदारीचा इशारा देताना, शासकीय यंत्रणाही समन्वयातून सतर्क राहिली आहे.सध्या कोयना धरणाचा जलसाठा १,५४ टीएमसीने वाढून ७७.४० टीएमसी (धरण क्षमतेच्या ७३.५४ टक्के) झाला आहे. धरणातील पाण्याची आवक काहीशी घटून प्रतिसेकंद १७ हजार ९०६ क्युसेक झाली आहे. आवक पाण्याचा अंदाज घेत धरणातील जलविसर्ग करण्यात

### कोयनाच्या पाणीपातळीत वाढ

आहे. आज बुधवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंत गेल्या २४ तासांत कोयना पाणलोटात ५१.३३ मिमी पाऊस कोसळला आहे. कोयना पाणलोटात आजवर सरासरी २ हजार ३५१.३३ मिमी (वार्षिक सरासरीच्या ४७.०२ टक्के) पावसाची नोंद झाली आहे. पश्चिम घाट क्षेत्रात बुधवारी दिवसभरात तुरळक पाऊस झाल्याचे दिसते आहे. कोयनेच्या दरवाजातून काल मंगळवारी सकाळी ११ वाजल्यापासून ३ हजार ४०० क्युसेकचा जलविसर्ग सुरू करण्यात आला. जुलैच्या मध्यावर जलविसर्ग करण्याची ही पहिलीच वेळ होती. आता धरणक्षेत्रातील जोरदार पावसाने या जलविसर्गात आणि कृष्णा-कोयना नद्यांच्या पाणीपातळीतही वाढणार असल्याने या दोन्ही नद्यांकाठच्या लोकांना खबरदारीचा इशारा देताना(धरण क्षमतेच्या ७३.५४ टक्के) झाला आहे. धरणातील पाण्याची आवक काहीशी घटून प्रतिसेकंद १७ हजार ९०६ क्युसेक झाली आहे.

येणार असल्याने धरणाच्या दरवाजातील विसर्ग आणि त्याखालील कृष्णा- कोयना नद्यांची पाणीपातळी वाढणार असल्याची माहिती पाटणचे तहसीलदार अनंत गुरव यांनी दिली आहे.कोयना पाणलोटात दोन- चार दिवसांची ओढ घेवून परवा सोमवारी रात्रीपासून पुन्हा जोरदार पाऊस सक्रिय झाला.

# सीरियाच्या मुख्यालयावर हवाई हल्ला!

## शेजारच्या इमारतीतील अँकर लाईव्ह शो सोडून पळाली

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारताचे भविष्य हे त्याच्या मध्य पूर्वेमध्ये पुन्हा एकदा तणाव निर्माण झाला असून, स्वेदा येथे झालेल्या संघर्षात ड्रुझ अल्पसंख्याकांच्या संरक्षणाचा हवाला देत इस्रायलने बुधवारी दमास्कसमधील सीरियाच्या लष्करी मुख्यालयावर हवाई हल्ला केला आहे. इस्रायली संरक्षण दलांनी बुधवारी रात्री दमास्कसमधील संरक्षण मंत्रालयाजवळील सीरियाच्या लष्करी मुख्यालयाच्या प्रवेशद्वारावर हल्ला केला. सोशल मीडियावर या हल्ल्याचे अनेक व्हिडिओ व्हायरल होत आहेत.**



किमान १८ जण जखमी झाले आहेत, असे सीरियन आरोग्य मंत्रालयाने म्हटले आहे.इस्रायली संरक्षण दलांनी म्हटले आहे की, हा हल्ला दक्षिण सीरियातील ड्रुझ नागरिकांविरुद्ध सीरियाच्या कारवाईला प्रतिसाद म्हणून करण्यात आला आहे. इस्रायली अधिकाऱ्यांनी या वृत्ताला दुजोरा दिला आहे की, सरकारच्या निर्देशांनुसार कारवाया सुरू राहतील आणि पुढील घटनांसाठी सैन्य सतर्क आहे.संरक्षण मंत्री इस्रायल काट्झ यांनी सीरियाच्या सैन्याने सीमावर्ती भागातून माघार घेतली नाही, तर हल्ले सुरू ठेवण्याचा इशारा दिला आहे. दरम्यान, इस्रायलच्या या हल्ल्यावर अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, बुधवारी सीरियाच्या दमास्कसमध्ये इस्रायलने केलेल्या हल्ल्यांबद्दल त्यांना खूप चिंता वाटत आहे.सीरियाच्या दमास्कसमध्ये इस्रायलने डागलेले बॉम्ब सीरियाच्या लष्करी इमारतीवर पडल्यानंतर, इमारतीच्या मागे असलेल्या एका इमारतीत वार्तांकन करत असलेल्या सीरियन महिला पत्रकाराने आपल्या सीटवरून उठून धाव घेतल्याचा एक व्हिडिओही सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.या हल्ल्याचा व्हिडिओ इस्रायलचे संरक्षण मंत्री इस्रायल काट्झ यांनी शेअर केला असून, त्यांनी याला "वेदनादायी हल्ले सुरू झाले आहे" असे कॅप्शन दिले आहे.व्हिडिओमध्ये महिला पत्रकार शांतपणे कॅमेऱ्यासमोर बोलत असताना, अचानक तिच्या मागे असलेल्या इमारतीत स्फोट झाल्याचे दिसते आणि त्यानंतर ती खुर्चीवरून उठून धावताना दिसते.गेल्या महिन्यात इराणशी झालेल्या युद्धादरम्यान, इस्रायलने तेहरानमधील इराणच्या सरकारी वृत्तवाहिनीच्या कार्यालयावर लाईव्ह शोदरम्यान बॉम्बहल्ला केला होता, ज्यामुळे अँकरला प्रक्षेपणाच्या मध्यभागी पळून जावे लागले होते.या हल्ल्यामध्ये एकाचा मृत्यू झाला असून, किमान १८ जण जखमी झाले आहेत, असे सीरियन आरोग्य मंत्रालयाने म्हटले आहे.इस्रायली संरक्षण दलांनी म्हटले आहे की, हा हल्ला दक्षिण सीरियातील ड्रुझ नागरिकांविरुद्ध सीरियाच्या कारवाईला प्रतिसाद म्हणून करण्यात आला आहे. इस्रायली अधिकाऱ्यांनी या वृत्ताला दुजोरा दिला आहे की, सरकारच्या निर्देशांनुसार कारवाया सुरू राहतील आणि पुढील घटनांसाठी सैन्य सतर्क आहे.इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू आणि संरक्षण मंत्री इस्रायल काट्झ यांनी सीरियाच्या सैन्याने सीमावर्ती भागातून माघार घेतली नाही, तर हल्ले सुरू ठेवण्याचा इशारा दिला आहे.बुधवारी सीरियाच्या दमास्कसमध्ये इस्रायलने केलेल्या हल्ल्यांबद्दल त्यांना खूप चिंता वाटत आहे.सीरियाच्या दमास्कसमध्ये इस्रायलने डागलेले बॉम्ब सीरियाच्या लष्करी इमारतीवर पडल्यानंतर, इमारतीच्या मागे असलेल्या एका इमारतीत वार्तांकन करत असलेल्या सीरियन महिला पत्रकाराने आपल्या सीटवरून उठून धाव घेतल्याचा एक व्हिडिओही सोशल मीडियावर व्हायरल झाला

### लाईव्ह शोदरम्यान बॉम्बहल्ला


"वेदनादायी हल्ले सुरू झाले आहे" असे कॅप्शन दिले आहे. व्हिडिओमध्ये महिला पत्रकार शांतपणे कॅमेऱ्यासमोर बोलत असताना, अचानक तिच्या मागे असलेल्या इमारतीत स्फोट झाल्याचे दिसते आणि त्यानंतर ती खुर्चीवरून उठून धावताना दिसते.गेल्या महिन्यात इराणशी झालेल्या युद्धादरम्यान, इस्रायलने तेहरानमधील इराणच्या सरकारी वृत्तवाहिनीच्या कार्यालयावर लाईव्ह शोदरम्यान बॉम्बहल्ला केला होता, ज्यामुळे अँकरला प्रक्षेपणाच्या मध्यभागी पळून जावे लागले होते.भारताचे भविष्य हे त्याच्या मध्य पूर्वेमध्ये पुन्हा एकदा तणाव निर्माण झाला असून, स्वेदा येथे झालेल्या संघर्षात ड्रुझ अल्पसंख्याकांच्या संरक्षणाचा हवाला देत इस्रायलने बुधवारी दमास्कसमधील सीरियाच्या लष्करी मुख्यालयावर हवाई हल्ला केला आहे.

# चित्रपटाचे प्रदर्शन थांबवने चुकीचे आहे

## 'उदयपूर फाईल्स'च्या प्रदर्शनाबाबत न्यायालयाची महत्त्वाची टिप्पणी

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी केंद्रीय समितीला वादग्रस्त चित्रपट उदयपूर फाइल्स : कन्हैया लाल टेलर मर्डर यासंबंधीत याचिकांवर ताबडतोब, वेळ वाया न घालवता त्यांचा निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत. या चित्रपटाच्या निर्मात्यानी या प्रकरणात घाई करण्याची विनंती केली होती.**




दरम्यान सर्वोच्च न्यायालयात जेव्हा चित्रपटाचे निर्मात्यांनी युक्तीवाद केला की, दिल्ली उच्च न्यायालायाने चित्रपटाचे प्रदर्शन थांबवने चुकीचे आहे कारण हा स्थगितीचा आदेश निर्मात्याच्या भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराचे उल्लंघन करतो. यावर सर्वोच्च न्यायालयाने टिप्पणी केली की, कलम २१ (जगण्याचा मूलभूत अधिकार) हा कलम १९ (भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मुलभूत अधिकार) च्या अगोदर येईल.न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाला बागची यांनी चित्रपटाच्या निर्मात्यांना केंद्रीय समितीच्या निर्णयापर्यंत वाट पाहण्यास सांगितले. त्यानंतर या प्रकरणा संबंधीत याचिकांवरील सुनावणी पुढील सोमवार पर्यंत तहकूब करण्यात आली.

कोर्टाने चित्रपट निर्मात्यांना सांगितले की कन्हैया लाल टेलर हत्या प्रकरणातील आरोपी मोहम्मद जावेद याला चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर त्याच्या प्रतिष्ठेच्या नुकसानीबाबत भरपाई दिली जाऊ शकत नाही, पण चित्रपट निर्मात्यांना आर्थिक भरपाई दिली जाऊ शकते. न्यायमूर्ती कांत पुढे असेही म्हणाले की चित्रपट उद्योगामध्ये असेही मानले जाते की चित्रपटाभोवती जेवढा सस्पेंस तयार होईल तेवढं चांगले ठरते.

चित्रपट निर्मात्यांची बाजू मांडणारे वरिष्ठ वकील गौरव भाटिया यांनी युक्तीवाद केला की चित्रपटाचे प्रॉड्युसर आणि दिग्दर्शक याबरोबरच कन्हैया लाल यांचा मुलगा यांना जिवे मारण्याच्या धमक्या मिळत आहेत. न्यायालयाने त्यांना परिसरातील पोलिसांकडे जाण्याची परवानगी दिली.

### चित्रपट निर्मात्यांना धमकी

सर्वोच्च न्यायालयात सध्या दोन याचिकांवर सुनावणी सुरू आहे , ज्यापैकी एक रिट याचिका असून ही कन्हैया लाल हत्या प्रकरणातील आरोपीने दाखल केली आहे. तर दुसरी याचिका ही दिल्ली उच्च न्यायालयाने चित्रपटाच्या प्रदर्शनाला स्थगित देण्याचा जो आदेश दिला होता, त्याला आव्हान देत चित्रपटाच्या निर्मात्यांनी दाखल केली आहे. दरम्यान सर्व पक्षांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, वेळ न दवडता केंद्राच्या समितीने ताबडतोब याबाबत निर्णय घ्यावा, असे खंडपीठाने म्हटले आहे.हा चित्रपट ११ जुलै रोजी प्रदर्शित होणार होता. मात्र १० जुलै रोजी, केंद्राची समिती जोपर्यंत या चित्रपटावर कायमची बंदी घातली जावी अशी विनंती करणाऱ्या याचिकेवर निर्णय घेत नाही तोपर्यंत या चित्रपटाच्या प्रदर्शनाला स्थगिती दिली. हा चित्रपटामुळे समाजात विसंगतीला प्रोत्साहन मिळू शकते.

# मराठी भाषेवरुन रितेशला डिवचणाऱ्या पुनीतवर भडकला डीपी

गेल्या काही दिवसांपासून राज्यभरात मराठी भाषेचा मुद्दा चांगलाच चर्चेत आहे. या भाषावादामुळे राजकीय वातावरणसुद्धा चांगलंच तापलं आहे. त्यातच सोशल मीडियावर मराठी लोकांकडून अमराठी लोकांना मारहाण केल्याचे अनेक व्हिडीओ व्हायरल होत आहेत. त्यामुळे हा संघर्ष अधिकच वाढत असल्याचं पाहायला मिळत आहे. शिवाय काहीजण हट्टाने मराठी बोलणार नसल्याचं चिथावणीखोर वक्तव्य करत आहेत. अशातच रितेश देशमुखचा पापाराझीबरोबरच्या मराठी संवाद साधतानाचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. या व्हिडीओवरुन रील्स स्टार पुनीतने रितेशला चांगलंच सुनावलंय. याचा व्हिडीओ पुनीतने त्याच्या सोशल मीडियावर शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये पुनीत रितेशबद्दल असं म्हणतोय, “तू मराठी भाषेला पाठिंबा देत आहेस हे ठीक आहे, आम्हीसुद्धा मराठी भाषेला पाठिंबा देत आहोत. पण, कोणी तुझ्याबरोबर हिंदीमध्ये बोलत आहे; तर त्याचा अपमान करण्याचा अधिकार तुला कोणी दिला? आणि तुला तरी कुठे मराठी येतं? तू स्वतःसुद्धा इंग्रजी शाळेत शिकला आहेस आणि तू ख्रिश्चन मुलीबरोबर लग्न केलं आहेस.”पुनीतच्या या व्हिडीओवर अनेकांनी कमेंट्स करत



त्याला सुनावलं आहे. अशातच आता ‘बिग बॉस मराठी’ फेम धनंजय पोवारनेही प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. धनंजय पोवारने त्याच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर एक व्हिडीओ शेअर केला आहे. या व्हिडीओमधून धनंजयने रितेशची बाजू घेत पुनीतवर टीका केली आहे.या व्हिडीओत तो असं म्हणतोय, “या पुनीत सुपरस्टारला अक्कल असली पाहिजे, ज्या व्यक्तीबद्दल आपण बोलतोय, त्याची पार्श्वभूमी आपल्याला माहीत आहे का? घरच्यांबरोबर आणि आपल्या मुलांबरोबर ते ज्याप्रकारे वागतात, त्यामुळे महाराष्ट्रात त्यांच्याकडे एक संस्कारी व्यक्ती म्हणून आम्ही पाहतो. आम्ही त्यांना आदर्श मानतो. शिवाय महाराष्ट्रातीलही बरेच जण त्यांना आदर्श मानतात.”यानंतर धनंजय असं म्हणतो, “पुनीत तू त्यांना (रितेश देशमुख) कोणत्या थराला जाऊन बोलत आहेस. तुझी लायकी नसताना तू बोलू नकोस. लायकी हा शब्द वापरणं चूक आहे; पण तूझे जे व्हिडीओ बनवतोस, त्यातून तुझे विचार कळतात. त्यामुळे तू त्यांच्याबद्दल कोणतीही गोष्ट नको बोलूस.”गेल्या काही दिवसांपासून राज्यभरात मराठी भाषेचा मुद्दा चांगलाच चर्चेत आहे. या भाषावादामुळे राजकीय वातावरणसुद्धा चांगलंच तापलं आहे. त्यातच सोशल मीडियावर मराठी लोकांकडून अमराठी लोकांना मारहाण केल्याचे अनेक व्हिडीओ व्हायरल होत आहेत. त्यामुळे हा संघर्ष अधिकच वाढत असल्याचं पाहायला मिळत आहे. शिवाय काहीजण हट्टाने मराठी बोलणार नसल्याचं चिथावणीखोर वक्तव्य करत आहेत.

## तो चांगला अभिनेता आहे पण

अभिनेता आर माधवन हा बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेता आहे. त्याने त्याच्या सहज सुंदर अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. आर माधवनचा मोठा चाहतावर्ग आहे. नुकताच त्याचा ‘आप जैसा कोई’ हा चित्रपट नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाला आहे. आर माधवन चित्रपट तसेच इंडस्ट्रीतील कलाकारांबद्दल आपली मतं मांडत असतो. आता त्याने बॉलीवूड अभिनेता रणवीर सिंहबद्दल केलेलं वक्तव्य चर्चेत आहे. आर माधवन लवकरच ‘धुरंदर’ चित्रपटात झळकणार आहे. आदित्य धरने या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. यामध्ये अभिनेता रणवीर सिंह मुख्य भूमिकेतून झळकणार आहे. या सिनेमात आर माधवन व रणवीर सिंह पहिल्यांदाच एकत्र काम करत आहेत. आर माधवनने नुकतच रणवीर सिंहबद्दल वक्तव्य केलं आहे.‘इंडियन एक्स्प्रेस’च्या वृत्तानुसार आर माधवन रणवीर सिंहबद्दल म्हणाला, “मला वाटत नाही की, रणवीर सिंहला कधी नकार मिळाले असतील.

## माझ्याशी लग्न करशील?

सोशल मीडियाद्वारे अनेक चाहते आपल्या आवडत्या कलाकारांना लग्न करण्याची मागणी करताना दिसतात. चाहत्यांच्या या मागणीला कलाकार मंडळी अनेकदा मजेदार किंवा हलक्या-फुलक्या पद्धतीने उत्तर देतात. असंच काहीसं झालं आहे अभिनेत्री जिनिलीया देशमुख हिच्याबरोबर. साऊथ आणि बॉलीवूडसह मराठी इंडस्ट्रीत आपल्या अभिनयाने आणि मनमोहक सौंदर्याने अनेकांची मनं जिंकणारी अभिनेत्री म्हणजे जिनिलीया देशमुख. आपल्या अभिनयाने चर्चेत राहणारी जिनिलीया सोशल मीडियावरही तितकीच सक्रीय असते. सोशल मीडियावर ती तिचे अनेक स्टायलिश फोटो शेअर करत असते. त्याचबरोबर ती रितेशबरोबरही काही मजेशीर व्हिडीओ शेअर करत असते. अशातच जिनिलीयाने सोशल मीडियाद्वारे चाहत्यांशी संवाद साधला.अभिनेत्रीने इन्स्टाग्रामवरील आस्क मी सेशनद्वारे चाहत्यांना प्रश्न विचारण्यास सांगितलं. अशातच एका चाहत्याने जिनिलीयाला चक्क लग्नाची मागणी घातली आहे. इन्स्टाग्राम स्टोरीवर चाहत्याने असं म्हटलं की, “माझं तुझ्यावर प्रेम आहे, लग्न करशील का?” चाहत्याच्या या प्रश्नाला उत्तर देत जिनिलीया असं म्हणाली, “मी विचार केला असता; पण माझं सर्वात सुंदर व्यक्तीबरोबर लग्न केलं आहे.”जिनीलियाने दिलेल्या या उत्तरातून त्याचं रितेशवरील प्रेम दिसून येतं. यानंतर तिला आणखी एका चाहत्याने नात्याबद्दल सल्ला विचारला. यावर जिनिलीयाने “कोणाचाही सल्ला ऐकू नका. तुम्ही स्वत: त्या नात्याचा अनुभव घ्या” असं म्हणाली. दरम्यान, रितेश-जिनिलीयाकडे एक आदर्श जोडी म्हणून पाहिलं जातं.



## कलाकारांना फक्त ऐकूनच घ्यावं लागतं

प्रसिद्ध राशीचक्रकार शरद उपाध्ये यांनी काही दिवसांपूर्वीच फेसबूक पोस्ट शेअर करत निलेश साबळेवर टीका केली होती. यानंतर निलेशने सविस्तर व्हिडीओ शेअर करत याप्रकरणी आपली बाजू स्पष्ट केली. कोणतीही पोस्ट लिहिताना नीट माहिती घेणं आवश्यक आहे. सरांचा मी फॅन होतो आणि कायम राहीन असंही अभिनेत्याने त्याच्या व्हिडीओमध्ये सांगितलं होतं. आता नुकत्याच ‘लोकशाही’ला दिलेल्या मुलाखतीत डॉ. निलेश साबळेने हा विषय माझ्यासाठी कायमचा संपला असून मी कायम शरद उपाध्ये सरांचा आयुष्यभर आदर करेन असं सांगत पुन्हा एकदा या प्रकरणावर भाष्य केलं आहे.शरद उपाध्ये प्रकरणाविषयी बोलताना निलेश साबळे म्हणाला, “मी तो विषय आता विसरून गेलोय, तुम्ही विचारलात म्हणून...कारण, एखादी गोष्ट तेव्हाच थांबते जेव्हा आपण त्याविषयीचं बोलणं थांबवतो. मी त्या व्हिडीओमध्ये नमूद केल्याप्रमाणे सन्माननीय शरद उपाध्ये सरांनी यापूर्वी सुद्धा दोन-तीनवेळा अशा पोस्ट केल्या होत्या. तेव्हा मी गोष्टी सोडून दिल्या होत्या. सहा वर्षांपूर्वी सुद्धा त्यांनी अशीच एक पोस्ट लिहिली होती... त्यातही त्यांनी बरंच काही म्हटलं होतं.”अभिनेता पुढे म्हणाला, “शेवटी सांगायचं काय तर कलाकारांना फक्त ऐकूनच घ्यावं लागतं. कलाकार व्यक्त झाले तरी समस्या निर्माण होते आणि एखादा कलाकार व्यक्त झाला नाही तरी समस्या निर्माण होतात. पूर्वी या गोष्टी व्हायच्या नाहीत. पण, आता काय झालंय... प्रत्येकाच्या हातात मोबाइल आहे. त्यामुळे मला अमिताभ बच्चन यांच्याबद्दल जरी लिहायचं असेल तरी मी पटकन लिहू शकतो. माझी पोस्ट जर त्यांच्यापर्यंत पोहोचली.



## राशाच्या जबरदस्त डान्सने वेधलं लक्ष

बॉलीवूडच्या कलाकारांची मुलं आता मोठ्या पडद्यावर पाहायला मिळत आहेत. २०२३मध्ये शाहरुख खानची मुलगी सुहाना खान, अमिताभ बच्चन यांचा नातू अगस्त्य नंदा, श्रीदेवींची मुलगी खुशी कपूर यांनी बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं. त्यानंतर गेल्या वर्षी आमिर खानचा मुलगा जुनैद खानने ‘महाराज’ चित्रपटाच्या माध्यमातून इंडस्ट्रीत पाऊल ठेवलं. आता रवीना टंडनची १९ वर्षांची मुलगी मोठ्या पडद्यावर झळकण्यासाठी सज्ज झाली आहे. तिच्या पहिल्या-वहिल्या चित्रपटातील गाणं प्रदर्शित झालं असून तिच्या जबरदस्त डान्सने सगळ्यांचं लक्ष वेधलं आहे. नेटकरी रवीना टंडनच्या मुलीची तुलना सुहाना खान, खुशी कपूरसह कतरिना कैफबरोबर करत आहेत. रवीना टंडनच्या १९ वर्षीय मुलीचं नाव राशा थडानी आहे. ती ‘आजाद’ या चित्रपटाच्या माध्यमातून बॉलीवूडमध्ये पदार्पण करण्यासाठी तयार झाली आहे. याच चित्रपटातील तिचं पहिलं गाणं ‘उई अम्मा’ प्रदर्शित झालं आहे. या गाण्यावर राशाचा डान्स पाहून नेटकरी भरभरून कौतुक करत आहेत. तिने आपल्या डान्ससह हावभावाने सगळ्यांची मनं जिंकली आहेत.राशा थडानीचं ‘उई अम्मा’ गाणं ४ जानेवारीला प्रदर्शित झालं. मधुबंती बागने हे गाणं गायलं असून अमित त्रिवेदीने संगीतबद्ध केलं आहे. तर अमिताभ भट्टाचार्य गीतकार आहेत. या गाण्यातील जबरदस्त डान्समुळे राशा चांगलीच भाव खाऊन गेली आहे. त्यामुळेच तिचं कौतुक होतं आहे.राशाचं ‘उई अम्मा’ गाणं पाहून एका नेटकऱ्याने लिहिलं की, हे खरं पदार्पण आहे. तिचे हावभाव जबरदस्त आहेत. तर दुसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं, “सुहाना खान आणि खुशी कपूरपेक्षा राशाने खूप छान परफॉर्मन्स केला आहे.

# वेस्ट इंडिज संघाला मोठा धक्का!

## आणखी एका प्रमुख खेळाडू आंद्रे रसेलने निवृत्तीची घोषणा

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गेल्या काही वर्षात वेस्ट इंडिजच्या अनेक दिग्गज खेळाडूंनी क्रिकेटला रामराम करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे एकेकाळी सलग २ टी – २० वर्ल्डकप जिंकणारा वेस्ट इंडिजचा संघ आता संघर्ष करत आहे. एकापेक्षा एक भेदक मारा करणारे गोलंदाज आणि आक्रमक फलंदाजी करणारे फलंदाज असलेल्या वेस्ट इंडिज संघातील प्रमुख खेळाडूंनी संघाची साथ सोडण्याचा निर्णय घेतला. यात आणखी एक नाव जोडलं जाणार आहे. वेस्ट इंडिजचा स्टार अष्टपैलू खेळाडू आंद्रे रसेलने आंतरराष्ट्रीय क्रिकेटला रामराम करण्याचा निर्णय घेतला आहे. आयसीसीने पोस्ट शेअर करत याबाबत माहिती दिली आहे.**




एका महिन्यापूर्वीच वेस्ट इंडिजचा स्टार फलंदाज निकोलस पूरनने वयाच्या २९ व्या वर्षी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली होती. या निर्णयामुळे अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला होता. आता आंद्रे रसेल देखील या संघाची साथ सोडणार आहे. वेस्ट इंडिजच्या मर्यादित षटकांच्या क्रिकेट संघातील महत्वाचा भाग असलेल्या आंद्रे रसेलची ऑस्ट्रेलियाविरुद्ध होणाऱ्या ५ टी -२० सामन्यांच्या मालिकेसाठी निवड करण्यात आली आहे. मात्र, तो या मालिकेतील केवळ २ सामने खेळून आंतरराष्ट्रीय क्रिकेटला अलविदा करणार आहे. हा वेस्ट इंडिज क्रिकेट संघासाठी मोठा धक्का आहे.ऑस्ट्रेलियाचा संघ वेस्ट इंडिज दौऱ्यावर आहे. कसोटी मालिकेनंतर आता दोन्ही संघ टी -२० मालिकेत आमनेसामने येणार आहेत.

ही मालिका आंद्रे रसेलच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील शेवटची मालिका ठरणार आहे. तो मालिकेतील सुरुवातीचे २ सामने खेळणार आहे. आंद्रे रसेलने वेस्ट इंडिजसाठी ८४ टी -२० सामने खेळले आहेत. तो आपल्या होम ग्राउंडवर शेवटचे २ सामने खेळणार आहे.आंद्रे रसेलने वेस्ट इंडिजला २०१२ आणि २०१६ टी -२० वर्ल्डकप जिंकून देण्यात मोलाची भूमिका बजावली होती. इथून पुढे तो केवळ लीग क्रिकेट स्पर्धा खेळताना दिसून येणार आहे. शाई होप (कर्णधार), ज्वेल अँड्रयू, जेडिया ब्लेड्स, रोस्टन चेस, मॅथ्यू फोर्डे, शिमरॉन हेटमायर, जेसन होल्डर, अकिल होसेन, अल्झारी जोसेफ, ब्रँडन किंग, एविन लुईस, गुडाकेश मोटी, रोवमन पॉवेल, आंद्रे रसेल, शेरफेन रुदरफोर्ड, रोमारियो शेफर्डएका महिन्यापूर्वीच वेस्ट इंडिजचा स्टार फलंदाज निकोलस पूरनने वयाच्या २९ व्या वर्षी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली होती. या निर्णयामुळे अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला होता. आता आंद्रे रसेल देखील या संघाची साथ सोडणार आहे. वेस्ट इंडिजच्या मर्यादित षटकांच्या क्रिकेट संघातील महत्वाचा भाग असलेल्या आंद्रे रसेलची ऑस्ट्रेलियाविरुद्ध होणाऱ्या ५ टी -२० सामन्यांच्या मालिकेसाठी निवड करण्यात आली आहे. मात्र, तो या मालिकेतील केवळ २ सामने खेळून आंतरराष्ट्रीय क्रिकेटला अलविदा करणार आहे. हा वेस्ट इंडिज क्रिकेट संघासाठी मोठा धक्का आहे.ऑस्ट्रेलियाचा संघ वेस्ट इंडिज दौऱ्यावर आहे. कसोटी मालिकेनंतर आता दोन्ही संघ टी -२० मालिकेत आमनेसामने येणार आहेत. ही मालिका आंद्रे रसेलच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील शेवटची मालिका ठरणार आहे. तो मालिकेतील सुरुवातीचे २ सामने खेळणार आहे.

### आंतरराष्ट्रीय क्रिकेटला अलविदा

आंद्रे रसेलने वेस्ट इंडिजसाठी ८४ टी -२० सामने खेळले आहेत. तो आपल्या होम ग्राउंडवर शेवटचे २ सामने खेळणार आहे.आंद्रे रसेलने वेस्ट इंडिजला २०१२ आणि २०१६ टी -२० वर्ल्डकप जिंकून देण्यात मोलाची भूमिका बजावली होती. इथून पुढे तो केवळ लीग क्रिकेट स्पर्धा खेळताना दिसून येणार आहे.शाई होप (कर्णधार), ज्वेल अँड्रयू, जेडिया ब्लेड्स, रोस्टन चेस, मॅथ्यू फोर्डे, शिमरॉन हेटमायर, जेसन होल्डर, अकिल होसेन, अल्झारी जोसेफ, ब्रँडन किंग, एविन लुईस, गुडाकेश मोटी, रोवमन पॉवेल, आंद्रे रसेल, शेरफेन रुदरफोर्ड, रोमारियो शेफर्डगेल्या काही वर्षात वेस्ट इंडिजच्या अनेक दिग्गज खेळाडूंनी क्रिकेटला रामराम करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे एकेकाळी सलग २ टी – २० वर्ल्डकप जिंकणारा वेस्ट इंडिजचा संघ आता संघर्ष करत आहे. एकापेक्षा एक भेदक मारा करणारे गोलंदाज आणि आक्रमक फलंदाजी करणारे फलंदाज असलेल्या वेस्ट इंडिज संघातील प्रमुख खेळाडूंनी संघाची साथ सोडण्याचा निर्णय घेतला.

# मोहम्मद सिराजची भावनिक पोस्ट

## पराभवानंतर मोहम्मद सिराजच्या डोळ्यांत अश्रू तरळले

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लॉर्डसच्या मैदानावर खेळवण्यात आलेल्या भारत व इंग्लंड संघांमधील तिसऱ्या कसोटी सामन्यात भारताचा २२ धावांनी पराभव झाला. या सामन्यातील भारताच्या दुसऱ्या डावात फलंदाज अपयशी ठरल्यानंतर अष्टपैलू रवींद्र जडेजा खिंड लढवत होता. त्याचवेळी जलदगती गोलंदाज जसप्रीत बुमराह व मोहम्मद सिराज हे जडेजाच्या खांद्याला खांदा लावून मैदानात उभे होते.**




बुमराह तब्बल १०० मिनिटे मैदानावर उभा राहिला तर, सिराज देखील एक तास किल्ला लढवत होता. परंतु, दोघे भारतीय संघाला विजय मिळवून देऊ शकले नाहीत.भारतीय संघाला २२ धावांची आवश्यकता असताना इंग्लंडकडून ७५ वे षटक टाकण्यासाठी शोएब बशीर गोलंदाजीला आला. या षटकातील सुरुवातीचे २ चेंडू खेळल्यानंतर, तिसऱ्या चेंडूवर जडेजाने १ धाव घेतली आणि स्ट्राइक मोहम्मद सिराजला दिला. सिराजला या षटकातील ३ चेंडू खेळून काढायचे होते. या षटकातील पाचव्या चेंडूवर सिराजने बचाव केला. त्यानंतरही चेंडू वेग व हवेमुळे यष्टीवर जाऊन आदळला.

### मोहम्मद सिराजने काय म्हटलंय?

त्यामुळे सिराज त्रिफळाचित झाला. सिराजने ३० चेंडू खेळून ४ धावा जमवल्या.बाद झाल्यानंतर सिराज स्वतःवर नाराज होता. पराभवानंतर त्याच्या डोळ्यांत अश्रू तरळले होते. दरम्यान, या पराभवानंतर सिराज पहिल्यांदाच सर्वांसमोर व्यक्त झाला आहे. त्याने समाजमाध्यमांवर एक पोस्ट शेअर केली आहे. ही पोस्ट वाचून तुम्ही देखील भावूक व्हाल.सिराजने या पोस्टमध्ये लॉर्ड्स कसोटी सामन्यातील शेवटच्या काही क्षणांचे फोटो शेअर केले आहेत. यासह कॅप्शनमध्ये त्याने म्हटलं आहे की "काही सामन्यांच्या आठवणी कायम तुमच्याबरोबर राहतात. त्या सामन्यांच्या निकालामुळे नव्हे तर त्यातून तुम्ही काय शिकता यासाठी ते सामने तुमच्याबरोबर राहतात."भारताने लॉर्डसवरील सामना गमावला असला तरीदेखील सिराज, जडेजा आणि बुमराहने फलंदाजीत दिलेलं योगदान कोणीच विसरू शकणार नाही. बुमराह १०० मिनिट खेळपट्टीवर टिकून होता, जडेजा शेवटपर्यंत लढला. सिराजच्या खांद्याला चेंडू लागूनही तो पुन्हा फलंदाजीला आला.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। मंगळवार ।
। दि. 18 मार्च 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## शिक्षण विश्व: के. टी. जाधव : बारावीनंतर अभियांत्रिकीला विद्यार्थ्यांची प्रथम क्रमांकाची पसंती

# अभियांत्रिकी विभागाच्या 113 शाखांमधील करिअरच्या संधी!

। पुणे । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**बारावी हा विद्यार्थ्यांच्या जीवनातला एक खूप महत्त्वाचा टप्पा आहे. बारावीनंतर घेतलेले अभ्यासक्रम भविष्यात चांगले करिअर घडविण्यासाठी फायदेशीर ठरतात म्हणूनच, विद्यार्थ्यांना करिअरच्या महत्त्वपूर्ण पर्यायांची माहिती असणे आवश्यक आहे. बारावीनंतर अनेक विद्यार्थी अभियांत्रिकी ला प्रथम क्रमांकाची पसंती देतात.**

अभियांत्रिकी क्षेत्रात होणाऱ्या सातत्यपूर्ण संशोधन व तंत्रज्ञान विकासामुळे नवनवीन अभियांत्रिकी शाखा उदयास येत असतात. त्यामुळे अभियांत्रिकी क्षेत्रातील विविध शाखांची माहिती करून घेणे आणि शाखांतील संधीचा शोध घेणे आवश्यक आहे. या सर्व बाबींचा सखोल अभ्यास करुन अभियांत्रिकी शाखेची निवड केली तर भविष्यात चांगले करिअर घडविण्यासाठी मदत होते. आत्ता सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे की, या पुढील काळात अभियांत्रिकीचा कोणता अभ्यासक्रम महत्त्वाचा ठरेल आणि कोणते महाविद्यालय निवडावे, जेणेकरून भविष्यात करिअरच्या उत्तम संधी मिळतील. अभियांत्रिकीची शाखा निवडताना विद्यार्थी ठराविक शाखांचा विचार करतात उदाहरणार्थ कॉम्प्युटर इंजिनीअरिंग, इन्फॉर्मेशन TECHNOLOGY, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, सिव्हिल, केमिकल इंजिनिअरिंग या ठराविक शाखांचा विचार करतात. अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या आपल्या राज्यात 113 हून अधिक शाखा आहेत, या शाखांमध्येही करिअरच्या आणि नोकरीच्या भरपूर संधी असतात. सध्याच्या काळात ARTIFICIAL INTELLIGENCE, DATA SCIENCE, ROBOTICS & AUTOMATION, MACHINE LEARNING, सायबर SECURITY, MECHATRONICS अशा अनेक शाखातून चांगले करियर होऊ शकते.

अभियांत्रिकी क्षेत्रात करिअर करणे सोपे आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी गोंधळून न जाता आपली आवड, क्षमता याचा विचार करून पदवीनंतर पुढे आणखी शिक्षण घ्यायचे की नोकरी करायची आहे, अशा सगळ्यांचा योग्य विचार करून अभियांत्रिकी शाखा निवडावी. महाविद्यालय निवडताना त्या त्या महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेली माहिती वाचावी आणि तपासून पाहावी ज्यामध्ये त्या कॉलेजचे AFFILIATION, NBA ACCREDITATION, NAAC ACCREDITATION, AUTONOMOUS STATUS, पायाभूत सुविधा, प्राध्यापक वर्ग, कॅम्पससाठी तयारी करून घेणारे ट्रेनिंग प्रोग्राम, कँपस निवडीसाठी येणाऱ्या कंपन्या, त्यातून मिळणाऱ्या नोकऱ्या यांची माहिती घ्यावी. शक्य असेल तर त्या महाविद्यालयास भेट देऊन तेथील प्राध्यापकांशी चर्चा करावी किंवा तेथे सध्या शिकत असलेल्या विद्यार्थ्यांशी बोलावे. या सर्व गोष्टी तूमच्या कॉलेजच्या निवडीसाठी फायद्याच्या ठरू शकतात. राज्यात 342 इंजिनिअरिंग कॉलेज आहेत. ते कॅप राउंडमध्ये सहभागी होतात.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र विभागांतर्गत असणाऱ्या तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत डिप्लोमा, ENGINEERING, PHARMACY, आर्किटेक्चर आणि इतर शाखांच्या प्रवेशांची प्रक्रिया राबविली जाते. याविषयीची संबंधित सर्व माहिती WWW.DTEMAHARASHTRA@GOV.IN किंवा CETCELL.MAHACET.ORG या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. नुकतीच तंत्रशिक्षण विभागाने अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया जाहीर केली आहे. ज्यामध्ये विद्यार्थ्यांना रजिस्ट्रेशन प्रोसेस COMPLETE करून प्रेफरन्स फॉर्म भरायचा असतो. या वर्षी CAP राऊंडच्या 4 फेऱ्या असतील. विद्यार्थ्यांना स्वत:च्या पसंतीचं महाविद्यालय व शाखा मिळेपर्यंत पुढच्या फेरीमध्ये सहभागी होण्याची संधी असते. त्यामुळे पहिल्या फेरीमध्ये हवे ते महाविद्यालय किंवा शाखा मिळाली नाही तरी निराश होण्याची गरज नाही. पुढच्या फेरीमध्ये तुम्ही प्रयत्न करू शकता.

महाराष्ट्र बोर्डाचा बारावीचाही निकाल जाहीर झाला आहे. यात राज्याचा निकाल 91.88 टक्के लागला आहे. या वर्षी बोर्डाचा निकाल गत वर्षीपेक्षा 2 टक्क्यांनी कमी लागला आहे. दरम्यान, अभियांत्रिकीच्या MH CET चाही निकाल लागला आहे. या परीक्षेमध्ये 2,95,577 विद्यार्थ्यांनी PCM ग्रुपमधून EXAMINATION दिली होती. आता जे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत, ज्याना चांगले मार्क्स आणि PERCENTILE मिळाले आहे त्यांच्यासाठी मात्र, करिअरच्या दृष्टीने अनेक महत्त्वाचे प्रश्न तयार झाले आहेत. तुम्हाला बारावीनंतर पुढे कोणता करिअर ऑप्शन निवडावा यासाठी काही पर्याय आहेत, ज्यांचा वापर करून तुम्ही तुमचे उज्ज्वल भविष्य घडवू शकता. प्रवेशा पूर्वी या शाखांची माहिती घेणे गरजेचे आहे. सुमारे 113 पेक्षा जास्त अभियांत्रिकीच्या शाखा आहेत. महत्त्वाच्या अभियांत्रिकी शाखांची माहिती जाणून घेऊया...



> ज्या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी पदवीनंतर MBA किंवा UPSC, MPSC या सारख्या स्पर्धा परीक्षांकडे वळायचे आहे. त्यांना कोणतीही शाखा किंवा कोणतेही महाविद्यालय निवडले तरी फारसा फरक पडत नाही, कारण त्या ठिकाणी मुख्यत्वे पदवी मिळवलेली असणे यालाच महत्त्व असते. ज्या विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी पदवीनंतर नोकरी करायची आहे त्यांनी अशा महाविद्यालयाची निवड काळजीपूर्वक करायची आहे ज्या महाविद्यालयामध्ये गेल्या काही वर्षांपासून कँपस निवडीसाठी चांगल्या कंपन्या येत आहेत. पर्यायाने भरपूर नोकऱ्या मिळत आहेत. ज्या विद्यार्थ्यांना पुढे तांत्रिक विषयातच भारतात वा परदेशात उच्च शिक्षण घ्यायचे आहे, त्यांच्यासाठी आवडत्या अभियांत्रिकी शाखेची निवड करणे जास्त महत्त्वाचे आहे. भविष्यात अभियांत्रिकीच्या अश्या सर्वच शाखांना उत्तम वाव आहे, मात्र तो अशाच विद्यार्थ्यांसाठी आहे जे अभियांत्रिकीच्या पहिल्या सत्रापासून सातत्याने प्रथम वर्गात उत्तीर्ण होतात, कारण कंपन्या जेव्हा महाविद्यालयात कॅम्पस निवडीसाठी येतात त्या वेळी विद्यार्थ्यांना मुलाखतीला बोलावताना सर्व सत्रांमध्ये प्रथम वर्गात उत्तीर्ण हा नियम लावतात. अभियांत्रिकीच्या चारही वर्षांत विद्यार्थ्यांनी गंभीरतेने आणि मन लावून अभ्यास केला तर खूप चांगले यश प्राप्त करू शकतो आणि आपल्या पालकांची स्वप्नं पूर्ण करू शकतो.
>
> **-डॉ. के. टी. जाधव,** डॉ. डी. वाय. पाटील ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स.

**COMPUTER ENGINEERING:** अभियांत्रिकीच्या प्रत्येक शाखेमध्ये संगणक अभियांत्रिकीची माहिती गरजेचं असते. या शाखेमध्ये हार्डवेअर इंजिनिअरिंग, सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी, मोबाइल टेक्नॉलॉजी, प्रोग्रागिंम लँग्वेजेस, कॉम्प्युटर असेंब्ली, इंटरनेट टेक्नॉलॉजी, कॉम्प्युटर ग्राफिक्स, डिझाइन, ॲनिमेशन इंजिनिअरिंग, ARTIFICIAL INTELLIGENCE, डाटा सायन्स, सायबर SECURITY या विषयांचा अंतर्भाव असतो. माहिती तंत्रज्ञानामुळे बायोइन्फर्मेटिक्स, रिमोट SENSING, ॲप्लिकेशन टेक्नॉलॉजी अश्या अनेक विद्याशाखा उदयास येत आहेत. COMPUTER ENGINEERING आणि INFORMATION TECHNOLOGY या दोन शाखांच्या अभ्यासक्रमात फारसा फरक नसल्याने त्यातली कोणतीही शाखा तुम्ही निवडू शकता. संगणक अभियंत्यांना नेटवर्क, पायाभूत सुविधा आणि संगणक प्रणाली तयार करणे, कंपनीचा डेटाबेस सुरक्षित आणि कार्यक्षम ठेवणे, अनेक ऑपरेटिंग सिस्टम, सॉफ्टवेअर आणि संगणक प्रोग्रामसाठी कोड तयार करणे, संगणक प्रणालीचे आर्किटेक्चर आणि इंटरफेस डिझाइन करणे, व्यवसायासाठी संशोधन प्रकल्पांचे समन्वय, सर्वेक्षण, संकलन, रेकॉर्डिंग आणि डेटाचे विश्लेषण करणे यांची जबाबदारी असते.

**ARTIFICIAL INTELLIGENCE:** भविष्यात आर्टिफिशियल इंटेलिजन्स हे तंत्रज्ञान मानवी जीवनाचा एक हिस्सा बनणार आहे. छोट्यात छोट्या कामात या एआय तंत्रज्ञानाचा वापर होऊ शकतो. तसेच आगामी काळात माहिती तंत्रज्ञानाप्रमाणेच एआय हा मानवी जीवनाचा एक भाग बनेल. जगभरात आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या मदतीने मशीन, कॉम्प्युटर आणि यंत्र बनवून भविष्यात महत्वाची कामे करण्यासाठी मानवाच्या बदली वापर केला जाऊ शकतो. म्हणजेच कोणतेही कठीण काम एका बुद्धिमान मशीनमार्फत केले जाऊ शकते. जर तुम्ही आयटी क्षेत्रातील नवीन क्षेत्रात करिअरचा मार्ग शोधत असाल, तर तुम्ही आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा कोर्स करुन तुमचे भविष्य उज्ज्वल करु शकता. भविष्यात या क्षेत्रात प्रचंड क्षमता आहे. तसेच या क्षेत्रात अनेक रोजगाराच्या उत्तम संधी आहेत. मशीन लर्निंग, डीप लर्निंग, NLP सॉफ्टवेअर ॲनालिटिक्स, रोबोटिक्स, प्रोग्रामर क्षेत्रातील नोकऱ्यांमध्ये भविष्यात सुमारे 33 टक्के अधिक क्षेत्रात संधी उपलब्ध होतील.

**DATA SCIENCE:** एखाद्या व्यवसाय अथवा ॲप्लिकेशन वा इंटरनेट चालू असताना तयार होत जाणाऱ्या माहितीचा वापर करून त्या व्यवसायास अथवा ॲप्लिकेशनला वृद्धिंगत करणे म्हणजे डेटा सायन्स. डेटा सायंटिस्टची गरज सर्वच क्षेत्रात आहे आणि असणार आहे. औषधनिर्मिती उद्योगात औषधाची परिणामकारकता व बँका त्यांची क्रेडिट रिस्क ठरवण्यासाठी गेली चाळीस वर्षे डेटा सायन्सचा वापर करत आहेत. वर्तमान काळात, ई-व्यवहारची चलती आहे. यामध्ये सर्वच क्षेत्रात डेटा सायन्स वापरले जाते. तसेच भविष्यात, कृत्रिम बुद्धिमत्ता, रोबोटिक्स, अवकाश संशोधनाच्या दृष्टीने डेटा सायन्स अतिशय महत्वाचे आहे. (पान 2 वर)

# अभियांत्रिकी विभागाच्या 113 शाखांमधील करिअरच्या संधी!

**CYBER SECURITY:** आपण आज आधुनिक युगात आहोत, जिथे पूर्वीपेक्षा जास्त तंत्रज्ञानाचा वापर होत आहे. नवनवीन तंत्रज्ञान, नवनवीन उपकरण यांच्यात वाढ होत आहे. त्यामुळे सायबरसुरक्षेचे महत्व ही वाढले आहे. सायबर सुरक्षा म्हणजे हार्डवेअर, सॉफ्टवेअर आणि डेटा यांसारख्या इंटरनेट-कनेक्टेड सिस्टमचे सायबर धोक्यांपासून संरक्षण करते. संगणक, मोबाइल उपकरणे, इलेक्ट्रॉनिक प्रणाली, सर्व्हर नेटवर्क आणि डेटा यांचा समावेश होतो. आपल्या जीवनात काही गोष्टी संवेदनशील असतात, त्या गोपनीय माहितीची सुरक्षा व्हावी म्हणून सायबरसुरक्षा असणे गरजेचे आहे. आताच्या जगात आपण सर्व इंटरनेटचा वापर करतो. त्यामुळे सध्याच्या घडीला सायबर सुरक्षा ही प्रत्येकाची गरज आहे. आरोग्यसेवा, छोटे व्यवसाय, सरकारी संस्था, उत्पादन, वित्तीय संस्था, शिक्षण यांनाही आपला डेटा गोपनीय ठेवण्यासाठी सायबर सुरक्षेची गरज लागते.



**MACHINE LEARNING:** मशीन लर्निंग हा आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा एक भाग असून प्रोग्रॅमिंगचे एक आधुनिक तंत्र आहे, ज्याद्वारे संगणक प्रोग्राम्स नवीन गोष्टींचा स्वतःहून अभ्यास करायला शिकतात आणि आवश्यकतेनुसार स्वतःहून निर्णय घेऊ शकतात. बऱ्याश्या मोठ्या कंपन्या म्हणजे OPENAI (CHATGPT), GOOGLE BRAIN, FACEBOOK, AMAZON, MICROSOFT यांनी मशीन लर्निंग याचा सर्वात जास्त उपयोग करून बरेचसे सॉफ्टवेअरस बनवले. बरीशी लोक विचार करतात की संगणक किंवा सॉफ्टवेअर कधीही मानवासारखा विचार करू शकत नाही त्यांचे कम्प्युटेशनल एनालिसिस आणि अल्गॉरिथ्म हे माणसाशी कधीही जोडू शकत नाही. मात्र मशीन लर्निंगमुळे हे सगळे सिद्ध झाले आहे. तंत्रज्ञानाच्या झपाट्याने विकसित होत असलेल्या या जगात MACHINE LEARNING एक परिवर्तनकारी शक्ती म्हणून उदयास आली आहे. स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मपासून ते आर्थिक व्यवहारांमध्ये फसवणूक शोधण्यापर्यंत, मशीन लर्निंग अल्गोरिदम आपल्या दैनंदिन जीवनातील अनेक पैलूंना शक्ती देत आहेत.

**ELECTRONICS AND TELECOMMUNICATION ENGINEERING:** इंजिनिअरिंग- माहिती, तंत्रज्ञानाच्या या युगात सर्वात झपाट्याने वाढवणारी अभियांत्रिकीची शाखा म्हणजे इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड TELECOMMUNICATION. लिनिअर इंटिग्रेटेड सर्किट्स, सॅटेलाइट कम्युनिकेशन, रोबोटिक्स, मायक्रोप्रोसेसर या प्रमुख विषयांचा अभ्यास या शाखांमध्ये केला जातो. आमूलाग्र बदल घडवून आणण्याची क्षमता असणारी शाखा, यामधे इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स, मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स, डिजिटल इलेक्ट्रॉनिक्स, व्हिडिओ ENGINEERING, इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड पॉवर अश्या शाखांचा विकास या क्षेत्रात झाला आहे.

**CIVIL ENGINEERING :** या अभियांत्रिकी शाखेमध्ये पर्यावरणाची रचना, चाचणी, बांधकाम आणि देखभाल या गोष्टींचा समावेश केला जातो. या मध्ये रस्ते, पूल आणि कालवे, ऊर्जा आणि नैसर्गिक आपत्तींना प्रतिसाद देण्याचे प्रकल्प सुद्धा समाविष्ट आहे. ही शाखा प्रामुख्याने बांधकाम क्षेत्राशी संबंधित आहे. बांधकामासाठी लागणारे साहित्य, यंत्रे व मनुष्यबळ, बांधकामाचे सर्वेक्षण, नियम, बांधकाम नियोजन, रेखाटन, मंजुरी, संरचना, संचालन, व्यवस्थापन, मूल्यांकन, मोजमाप, देखभाल, दुरुस्ती अनेक विषयांचा अभ्यास या शाखेमध्ये करण्यात येतो. या क्षेत्रात मध्ये इमारती, रस्ता, लोहमार्ग, विमानतळ, पाणीपुरवठा योजना, सांडपाणी योजना, धरणे व जलस्रोतच्या निर्मिती व उभारणीमध्ये स्थापत्य अभियांत्रिकी विद्याशाखेचे मोलाचे कार्य असते. शहर विकास व शहर नियोजनामध्येही अत्यंत महत्त्वाची भूमिका आहे.

**MECHANICAL ENGINEERING:** यंत्र व उपकरणांसंबंधीचा सखोल अभ्यास या शाखेत केला जातो. यांत्रिकीकरणाच्या आणि MANUFACTURING च्या प्रक्रियेत ही शाखा महत्वाची भूमिका बजावत असते. संशोधन आणि डिझाइनपासून ते स्थापनेपर्यंत आणि कमिशनिंगपर्यंत असणाऱ्या PRODUCT DEVELOPMENT च्या सर्व टप्प्यांवर काम करणारी ही एक शाखा आहे. यंत्र व उपकरणासंबंधीचे ड्रॉइंगस, सुटे भाग निर्मिती, यंत्र उभारणी, हाताळणी, देखभाल व दुरुस्ती या बाबींच्या अभ्यासासह यंत्र संरचना यावर विशेष भर या अभ्यासक्रमामध्ये दिलेला आहे. यंत्र संरचना, निर्मिती तंत्रज्ञान, रेफ्रिजरेशन व एअर कंडिशनिंग, थर्मोडायनामिक्स, पॉवर इंजिनिअरिंग, इंडस्ट्रियल AUTOMATION, AUTOMOBILE, फॅब्रिकेशन टेक्नॉलॉजी इत्यादी क्षेत्रात काम करू शकतात.

**ELECTRICAL ENGINEERING:** सध्याच्या काळात इलेक्ट्रिक VEHICLESची मागणी खूप वाढली आहे. या EMERGING TECHNOLOGY मध्ये इलेक्ट्रिक ENGINEERS ची मोठी मागणी आहे. इलेक्ट्रिकल अभियंते वस्तूचे उत्पादने, इलेक्ट्रिकल सिस्टमचे संशोधन, डिझाइन आणि चाचणी करतात. बांधकाम आणि सेवा, वाहतूक, उत्पादन, रोबोटिक्स, दूरसंचार, ऊर्जा आणि डिजिटल तंत्रज्ञान यासह अनेक उद्योग आणि क्षेत्रामध्ये समाविष्ट होऊ शकतात. ऊर्जा शोध, वीजनिर्मिती, वीज वापर, वितरण, नियंत्रण, केंद्र उभारणी, व्यवस्थापन, रूपांतरण संरचना या विद्युतविषयक बाबींचा यात समावेश आहे. रेखाटन, विद्युत प्रवाह मोजणी, विद्युत उपकरण निर्मिती, सुरक्षा व्यवस्थापन इत्यादी विषयदेखील विद्युत अभियांत्रिकीमध्ये समाविष्ट असतात.

**CHEMICAL ENGINEERING:** आजच्या काळात पेट्रोलियम, पेट्रोकेमिक, पॉलिमर, प्लास्टिक, बायोकेमिकल आणि बायोटेक्नॉलॉजी ही क्षेत्र आघाडीवर आहेत. ही सर्वच क्षेत्रे केमिकल इंजिनिअरिंगची निगडित आहेत. दैनंदिन जीवनातील अनेक वस्तूंचे उत्पादन व निर्मिती असो की सर्व प्रकारचे औषधे, साबण, पेट्रोल, डिझेल, केरोसीन, एलपीजी, गॅस, अल्कोहोल, खते, कीटकनाशके, पेंट्स, ग्रीस, कपडे, कागद, रबर, फायबर, प्लास्टिकच्या वस्तू, टूथपेस्ट, परफ्युम्स, इत्यादी वस्तू . केमिकल इंजिनिअरिंगच्या साह्याने तयार होते. त्यामुळे या क्षेत्रात नोकरीच्या भरपूर संधी उपलब्ध आहेत. भारतातील मोठमोठ्या कंपन्या उदाहरणार्थ रिलायन्स इंडस्ट्रीज, हिंदुस्तान लिव्हर, ओएनजीसी, ऑइल इंडिया लिमिटेड, आयपीसीएल, बीपीसीएल, एचपीसीएल, आरसीएफ, केमटॅक्स, रनबॅक्सी, एल ॲंड टी, कॅडबरी, ब्रिटानिया, नेरोलॅक पेंट्स, सुदर्शन केमिकल्स, दीपक नायट्रेट, एक्सेल इंडस्ट्रीज, फिनोलेक्स लिमिटेड, प्राज इंडस्ट्रीज या कंपन्यांमध्ये केमिकल इंजिनियर्सना प्रचंड मोठी मागणी आहे.

याशिवाय SEMICONDUCTOR ENGINEERING, पेट्रोलियम इंजिनिअरिंग, AEROSPACE इंजिनिअरिंग, ROBOTICS & AUTOMATION ENGINEERING, AUTOMOBILE इंजिनिअरिंग, INSTRUMENTATION इंजिनिअरिंग, ENVIRONMENTAL इंजिनिअरिंग, AGRICULTURAL इंजिनिअरिंग, BIOTECHNOLOGY, BIOMEDICAL इंजिनिअरिंग, प्लास्टिक इंजिनिअरिंग, पॉलिमर इंजिनिअरिंग, टेक्स्टाइल टेक्नॉलॉजी, प्रिंटींग टेक्नॉलॉजी, फायर इंजिनिअरिंग, फूड टेक्नॉलॉजी, NANO टेक्नॉलॉजी अश्या अनेक शाखा अभियांत्रिकीमध्ये उपलब्ध आहेत. त्यांच्या उपशाखांचा विस्तारदेखील फार झपाट्याने होत आहे व त्यातून रोजगार, स्वयंरोजगाराच्या नवनवीन संधी निर्माण होत आहेत. अश्या प्रकारे ज्ञानाच्या कक्षा रुंदावत असल्यामुळे भविष्यातदेखील नवनवीन विद्याशाखांचा विकास व विस्तार असाच अधिक जोमाने होईल. विद्याशाखांची परस्परांमध्ये मिक्स होऊन INTERDISCIPLINARY कोर्स तयार होतील.

अशा या होणाऱ्या बदलांकडे अतिशय जागरूकतेने लक्ष देणे गरजेचे आहे. तरच आपण योग्य अभियांत्रिकीच्या शाखेची निवड करून चांगले भविष्य घडवू शकतो.

